**प्रेस नोट** **दिनांक २८/०४/२०२३**

**नवी मुंबई महानगर पालिका, उप आयुक्त, परिमंडळ- २, कोपरखैरणे, नवी मुंबई येथील लिपीक टंकलेखक यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले बाबत,**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपच प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक | :- | कोपरखैरणे पोलीस स्टेशन,नवी मुंबई ठाणे दैनंदिनी नोंद क्र.३९/२०:२७ वा. दिनांक २८/०४/२०२३ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | दिनेश राजेंद्र सोनवणे, लिपीक टंकलेखक, नवी मुंबई महानगर पालिका, कोपखैरणे वॉर्ड, परिमंडळ- २, नवी मुंबई |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. ५,००,०००/- लाचेची मागणी |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू. ५,००,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार हे नवी मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई येथे कार्यरत असून तक्रारदार यांची नेरूळ येथून नवी मुंबई महानगर पालिका मुख्यालय येथे झालेली अंतर्गत बदली पुर्ववत करण्यासाठी तसेच तक्रारदार यांचे वार्षिक गोपनिय शेरे लवकरात लवकर पाठविण्याकरीता डॉ. अमरीश पटनिगीरे, उप आयुक्त (परिमंडळ-२) तथा उप आयुक्त, अतिक्रमण विभाग, मुख्यालय हे लोकसेवक दिनेश राजेंद्र सोनवणे, लिपीक टंकलेखक यांच्यामार्फत तक्रारदार यांच्याकडे रू. ५,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २८/०४/२०२३ रोजी अे.सी.बी. नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br>प्रस्तुत तकारीच्या अनुषंगाने दिनांक २८/०४/२०२३ रोजी शासकीय पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक दिनेश राजेंद्र सोनवणे, लिपीक टंकलेखक यांनी त्यांचे वरिष्ठांकरीता तक्रारदार यांच्याकडे रू. ५,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून सापळा कारवाई दरम्यान रू. ५,००,०००/- लाचेची रक्कम त्यांच्या कार्यालयात स्विकारले असता लोकसेवक दिनेश सोनवणे यांना १८:१४ वाजता रंगेहाथ पकडण्यांत आले आहे. |

**मार्गदर्शनअधिकारी :**

**१)मा.श्री.सुनिल लोखंडे सो. पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**२)श्री.अनिल घेरडीकर सो.अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शनब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

---

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका विरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

**संपर्कपत्ता** :-ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणेपश्चिम, ४००६०१
**संकेतस्थळ** :-acbmaharashtra@mahapolice.gov.in
**ई-मेल** :-spacbthane@mahapolice.gov.in
**ऑनलाईनतक्रार**
**ॲप्लिकेशन** :-acbmaharashtra.net
**टोलफ्रीनं.** :-१०६४
**दुरध्वनी क्र.** :-०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४
**व्हॉटसॲप क्र.** :-९९३०९९७७००